# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## समाज विकास विभाग

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिला व बालकल्याण योजना तसेच किन्नर व्यक्तींसाठी योजनेबाबत.

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिला व बालकल्याण योजना तसेच किन्नर व्यक्तीच्या कल्याणार्थ सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून ठाणे महानगरपालिका हद्दीत रहिवाशी असणाऱ्या महिला व बालकल्याण तसेच किन्नर व्यक्तींसाठी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता **योजना क्रमांक २,५,६,७,९,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९ या योजनांचे अर्ज** दि.२८ /०८/२०१९ ते दि.२६ /०९/२०१९ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. परिपूर्ण भरलेले अर्ज दि.२८/०८/२०१९ ते दि.२७/०९/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. **योजना क्र.१ कन्यादान योजना : आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विधवा / घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान देणे. योजना क्र.३ लाडकी लेक दत्तक योजना. (मुलगी दत्तक घेतल्यास त्या मुलीच्या पालन पोषणासाठी अर्थ सहाय्य देणे. ) योजना क्र.४ राजकन्या योजना : मुलगी जन्माला आल्यावर तिच्या सर्वांगिण विकासासाठी आर्थिक मदत करणे. योजना क्र. ८ पहिल्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या अथवा पहिली मुलगी असतांना दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या महिलेस अर्थसहाय्य करणे. योजना क्र.१० जिजामाता महिला आधार योजने अंतर्गत अर्थसहाय्य देणे. कुटूंबातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाल्यास एक रकमी अर्थसहाय्य देणे.** या योजनेची अर्ज वितरण मुदत दि.२९/२/२०२० रोजीपर्यत राहील.व परिपूर्ण भरलेले अर्ज दि.१/३/२०२० रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. एका लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

**समाज विकास विभागाकडून महिला व बालकल्याण तसेच किन्नर व्यक्तीसाठी पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.**

| अ.क्र | योजना क्र. | योजनेचे नाव |
|---|---|---|
| १ | १ | **कन्यादान योजना :** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विधवा / घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान देणे. |
| २ | २ | अनाथ /निराधार/ निराश्रित बालक/ HIV ग्रस्त मुले यांना उदनिर्वाहासाठी आर्थिक मदत करणे . (१८ वर्ष आतील मुलांना) |
| ३ | ३ | लाडकी लेक दत्तक योजना. (मुलगी दत्तक घेतल्यास त्या मुलीच्या पालन पोषणासाठी अर्थ सहाय्य देणे.) |
| ४ | ४ | **राजकन्या योजना :** मुलगी जन्माला आल्यावर तिच्या सर्वांगिण विकासासाठी आर्थिक मदत करणे.(१ नोव्हेंबर, २०१८ ते २९ फेब्रुवारी,२०२० या कालावधीत जन्मास आलेल्या मुलींकरीता) |
| ५ | ५ | गुणवत्ता प्राप्त मुली/महिला खेळाडूकरिता (राज्यस्तर ) शिष्यवृत्ती देणे. |
| ६ | ६ | गुणवत्ता प्राप्त मुली/महिला खेळाडूकरिता (राष्ट्रीयस्तर) शिष्यवृत्ती देणे. |
| ७ | ७ | गुणवत्ता प्राप्त मुली/महिला खेळाडूकरिता (आंतरराष्ट्रीय स्तर) शिष्यवृत्ती देणे. |
| ८ | ८ | पहिल्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या अथवा पहिली मुलगी असतांना दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या महिलेस अर्थसहाय्य करणे. |
| ९ | ९ | **नव संजीवनी योजना:-** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील दुर्धर आजाराने ग्रासलेल्या बालकांना/महिलांना (एचआयव्हीग्रस्त, कॅन्सरग्रस्त, अर्धांगवायू इ.सारखे गंभीर आजार) उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करणे. |
| १० | १० | **जिजामाता महिला आधार योजने अंतर्गत अर्थसहाय्य देणे.** कुटूंबातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाल्यास एक रकमी अर्थसहाय्य देणे. (वय २१ ते ७०) |
| ११ | ११ | किमान २ वर्ष पुर्ण झालेल्या नोंदणीकृत बचत गटांना फिरता निधी उपलब्ध करुन देणे. |
| १२ | १२ | ६० वर्ष व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या विधवा/ घटस्फोटीत महिलांच्या उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य देणे. |
| १३ | १३ | विधवा/ घटस्फोटीत महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. (१८ वर्ष आतील मुलांना ) |
| १४ | १४ | इयत्ता ८ वीच्या परीक्षेमध्ये ७०% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. शाळेतील) |

| | | |
|---|---|---|
| १५ | १५ | इयत्ता ९ वीच्या परीक्षेमध्ये ५५% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. शाळेतील) |
| १६ | १६ | इयत्ता १० वीच्या परीक्षेमध्ये ५५% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. शाळेतील) |
| १७ | १७ | इयत्ता १२ वीच्या परीक्षेमध्ये ६५% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. क्षेत्रातील) |
| १८ | १८ | पदवी परीक्षेत ६०% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे.(ठा.म.पा.क्षेत्रातील) |
| १९ | १९ | किन्नर व्यक्तीना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य देणे. |

**टिप :-** ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात महिला व बालकल्याण तसेच किन्नर व्यक्तींच्या योजनेचे वरील कालावधीमध्ये अर्ज उपलब्ध असून सदरचे अर्ज पुर्ण विहित कालावधीत भरुन संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. विविध योजनांचे छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आले असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
**मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने.**

(वर्षा दिक्षीत)
उपआयुक्त
समाज विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे